महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक :- सीएमए-०४२३/सीआर-०१/२०२३/ २१ दिनांक :- १२ मार्च, २०२४

# प्रसिध्दीपत्रक

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा -२०२२
(जाहिरात क्र.२६/२०२३)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ०९ सप्टेंबर,२०२३ रोजी घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा -२०२२, चा निकाल दिनांक १२ मार्च, २०२४ रोजी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून मुख्य परीक्षेसाठी विहित मुदतीत विहित शुल्कासह अर्ज सादर करणा-या उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. तपासणीअंती अपात्र ठरणा-या उमेदवारांची उमेदवारी, आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

३. पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरीता स्वीकारार्ह आहेत. उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे, त्यात परीक्षा केंद्र नमूद करणे व परीक्षा शुल्क विहित मुदतीत भरणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

४. प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा. उच्च न्यायालयांमध्ये दाखल झालेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयांच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

५. मुख्य परीक्षेच्या अनुषंगाने अधिसूचना / जाहिरात लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव (परीक्षा राजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग